

# बेघर बे-वतन होणारी माणसे - जगभरातील...

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

अस्वस्थ वर्तमान

*माणसे अगतिकतेने राहण्याचे गाव, प्रदेश, देश सोडतात. परिस्थिती - म्हणजे लोकांच्या नियंत्रणाबाहेरच्या शक्ती - त्यांच्यावर ही वेळ आणते. ही परिस्थिती स्थलकालविशेष असते - कोठे कमालीची गरीबी, कोठे युद्ध, कोठे दुष्काळ, इत्यादी. ही परिस्थिती सुधारण्याची शक्यता कमी दिसते. या मानवी वेदनेची नोंद घेणारा हा लेख!*

**प्रस्तावना**

जे लोक आपले वसतीस्थान सोडतात, ते स्थलांतरित. ते दोन प्रकारचे - एक ऐच्छिक स्थलांतर करणारे आणि दुसरे - सक्तीचे स्थलांतरित. दुसऱ्या वर्गात दोन प्रकार - सक्तीने स्थलांतर म्हणजे देश सोडणे असल्यास ते आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार निर्वासित होतात. देशांतर्गत स्थलांतरित होणारे - विस्थापित. या संदर्भात आणखी एक वर्ग आढळतो. ते लोक प्रत्येक वेळी स्थलांतरित असतीलच असे नाही - कधी असतील, कधी नसतील. पण त्यांची स्थिती सक्तीच्या स्थलांतरितांसारखी. म्हणून त्यांचा उल्लेख आवश्यक. हे लोक त्रिशंकूसारखे - ज्यांना कोणत्याही देशाचे नागरिकत्व नाही. त्यांना अनागरिक म्हणू.

अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी/नोकरीसाठी जाणारा भारतीय इंजिनीअर किंवा स्वत:चा विकसनशील देश सोडून बहुधा शेजारच्या विकसनशील देशात जाणारा मजूर - हे ऐच्छिक स्थलांतरण. यातील विकसनशील - ते - विकसनशील यांचा थोडक्यात उल्लेख पुढे आहे पण लेख प्रामुख्याने सक्तीने स्थलांतरण करायला लागलेल्या लोकांवर आहे.

माणसे अगतिकतेने राहण्याचे गाव, प्रदेश, देश सोडतात. परिस्थिती - म्हणजे लोकांच्या नियंत्रणाबाहेरच्या शक्ती - त्यांच्यावर ही वेळ आणते. ही परिस्थिती स्थलकालविशेष असते - कोठे कमालीची गरीबी, कोठे युद्ध, कोठे दुष्काळ, इत्यादी. ही परिस्थिती सुधारण्याची शक्यता कमी दिसते. या मानवी वेदनेची नोंद हा लेखाचा उद्देश आहे.

सुमारे साडे-सात अब्ज लोकसंख्या असणाऱ्या जगात आज साडेसहा कोटी

लोकांना सक्तीने स्थलांतरण करावे लागलेले आहे. ही संख्या विक्रमी आहे. ती सतत वाढतच आहे. यात सुमारे चार कोटी विस्थापित आहेत, सव्वा-दोन कोटी निर्वासित आहेत (निम्मी १८ वर्षांखालील मुले). शिवाय एक ते तीन कोटी लोकांना कोणत्याही देशाचे नागरिकत्व नाही. जगात दररोज चोवीस ते चौतीस हजार लोकांवर मजबुरीने ही वेळ येते. (यासंदर्भात एक खुलासा - लेखातील आकडेवारी निर्देशक आहे, निश्चित नाही. हर-एक संबंधित संस्था - संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक व इतर अनेक - निराळी आकडेवारी देते. त्यावरून या प्रश्नाची उकल करण्याची क्लिष्टता दिसते कारण या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये निम्न प्राधान्यक्रम आहे.) तरीही समस्या काही कोटी लोकांची आहे हे नक्की.

लेखात प्रथम यांची सद्यस्थिती आहे. त्यावरून त्यांचे भौगोलिक स्थान व संख्या कळावी. मग निर्वासित किती कष्टमय प्रवास करत देश सोडतात त्याची उदाहरणे आहेत. नंतर युरपमधील निर्वासितांची छाननी व बहुधा परत रवानगी कशी होते यासाठी इटलीचे उदाहरण दिले आहे. मग 'अनागरिकांचा' व त्यानंतर विकसनशील देश - ते - विकसनशील देश असे देशाटन करणाऱ्यांचा आढावा आहे. शेवटी निरीक्षण.

## सद्यस्थिती

### विस्थापित

विस्थापित निर्वासितांच्या दुप्पट आहेत. बऱ्याच वेळा ते देशाच्या हेतुत: धोरणामुळे किंवा अक्षमतेमुळे विस्थापित होतात. कायद्याने निर्वासित म्हटले नाही तरी त्यांची स्थिती प्रसंगी तितकीच बिकट असते. 'सगळे' सोडून परांगदा व्हायची वेळ येते आणि अन्न-वस्त्र-निवारा यांपासून सर्व गरजांसाठी परत शून्यातून प्रयत्न करायला लागतो. काही समूहांवर तर ही वेळ एकदाच येते असे नाही. '९० च्या दशकात जगात एकूण विस्थापित २ कोटीच्या आसपास होते. ते आज १२७ देशांमध्ये मिळून चार कोटी असावेत. परत, हे आकडे केवळ अंदाज आहेत. एक कारण म्हणजे देशांतर्गत स्थलांतरणाची निश्चित अधिकृत नोंद होत नाही. दुसरे म्हणजे आजवर विस्थापितात फक्त नैसर्गिक आपत्ती व हिंसाचार या कारणांचा समावेश होतो. 'विकास' योजनांमुळे (धरणे, औद्योगिक वसाहती, मोठे रस्ते, वगैरे) विस्थापित होणाऱ्यांची अधिकृत नोंद नीट केली जात नाही कारण ती राजकीयदृष्ट्या गैरसोयीची असते. २०१५ ला नव्याने विस्थापित झालेल्यात एक कोटी नव्वद लाख नैसर्गिक कारणांनी विस्थापित झाले तर ८५ लाख युद्ध, वांशिक संघर्ष, वगैरे हिंसाचाराने विस्थापित झाले.

### नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे विस्थापित

देशवार १० लाख किंवा अधिक विस्थापित खालीलप्रमाणे:

| नैसर्गिक आपत्ती | देश | विस्थापित |
|---|---|---|
| अतिवृष्टी महापूर, वादळ | भारत | ३८ लाख |
| अतिवृष्टी, महापूर, वादळ | चीन | ३८ लाख |
| भूकंप | नेपाळ | २६ लाख |
| वादळ | फिलिपिन्स | २० लाख |
| वादळ, दरडी कोसळणे | मियान्मार | १६ लाख |
| भूकंप, महापूर | पाकिस्तान | १० लाख |
| भूकंप, त्सुनामी | चिली (द. अमेरिका) | १० लाख |

इतर देशांत (मालावी -आफ्रिका, जपान, बांगलादेश) प्रत्येकी साधारण ५ लाख लोक विस्थापित झाले.

या देशांत जपान आणि चिली ही दोनच प्रगत राष्ट्रे आहेत. नैसर्गिक आपत्तीत विकसनशील देशांत अधिक हानी होते. त्यांच्याकडे संभाव्य संकटाची सूचना देणाऱ्या, तत्काळ मदत करणाऱ्या, पुनर्वसनाच्या यंत्रणा तसेच भविष्यात असे घडले तर कमीत कमी हानी होईल अशा उपायांचे नियोजन - सगळेच अपुरे असते. चिली हा युरपशी तुलना करता येण्यासारखा संपन्न देश आहे. तेथे २०१०च्या भूकंपामुळे सात-आठशे बळी पडले आणि १५ ते २० लाख विस्थापित झाले. त्यावरून धडा घेऊन भूकंपात टिकतील अशा इमारतींची बांधणी, आगाऊ सूचना, लोकांना भूकंपाआधी हलवणे व नंतर त्वरित आवश्यक मदत कार्य करणे अशा उपाय-योजना २०१५ साली करण्यात आल्या. त्यामुळे जवळ-जवळ तेवढ्याच तीव्रतेचा भूकंप होऊनही हानी कमी झाली (१९ मृत्यू). १० लाख लोकांना आधीच सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले होते. तीच गोष्ट डिसेंबर २०१६ च्या जरा कमी तीव्रतेच्या भूकंप व त्सुनामीची. लेख लिहिण्याच्या वेळापर्यंत तरी एकही माणूस मृत्युमुखी पडल्याची बातमी नव्हती. भूकंप झाल्यावर तीन तासातच धोका टळल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले जेणेकरून लोक घरी परतू लागले. प्रश्न फक्त पैशाचा, तंत्रज्ञानाचा दिसत नाही. राजकीय, सामाजिक इच्छाशक्तीही हवी.

आफ्रिकेत आधी गरीबी, त्यात ही इच्छाशक्ती नसल्याने वादळे, महामूर पाऊस अशा अचानक येणाऱ्या नैसर्गिक संकटांनी २०१५ साली सुमारे ११ लाख लोक म्हणजे विस्थापित झाले.

### हिंसाचाराने होणारे विस्थापित

२०१४ पेक्षा २०१५ मध्ये ३० लाख (दुसऱ्या अंदाजानुसार - ४८ लाख) जास्त लोक हिंसाचारामुळे विस्थापित झाले. २००३ पासून या संख्येत भरच पडत आहे.

खंडानुसार मध्य-पूर्व आणि उ. आफ्रिका - ४८ लाख, सहार वाळवंटाच्या दक्षिणेचा आफ्रिका - २२ लाख, युरप आणि मध्य आशिया - ९.५ लाख, द. आशिया ३.४ लाख व

द.अमेरिका - २.३ लाख. यातील येमेन (२२ लाख), सीरिया (१३ लाख) आणि इराक़ (११ लाख). या तीन देशातील विस्थापित एका अंदाजानुसार जगातील एकूण विस्थापितांच्या निम्म्याहून जास्त आहेत. नंतर युक्रेन (९ लाख) हा युरपमधील देश, आफ्रिकेतील नायजेरिया (७ लाख), काँगो (६ लाख) व इतर प्रत्येकी ५ लाखाहून कमी- अफगाणिस्तान, कोलंबिया, सेन्ट्रल आफ्रिकन रिपब्लिक, दक्षिण सुदान.

यातील दोन देश पाहू.

येमेन हा आफ्रिकेतील सगळ्यात गरीब देश आहे. तिथे तेल जवळजवळ नाहीच. आहे त्याचे उत्पादन पुढे दिलेल्या यादवीमुळे कमी झाले आहे. निम्मी जनता दारिद्र्यरेषेखाली आहे, ७० टक्के लोकांना घरी नळाचे पाणी नाही. तेथे २०१०-११च्या अरब वसंतादरम्यान प्रस्थापित राजवटीविरुद्ध लोक रस्त्यावर आले. ते दडपण्यासाठीचा सरकारी हिंसाचार, आधीपासूनचे शिया-सुन्नी वैमनस्य, दरम्यान अल-कईदाचा प्रवेश, इराणचा छुपा हस्तक्षेप व आता सौदी अरेबियाची शियाविरोधी लष्करी मोहीम - मुख्यत: नागरी वस्तींवर हवाई हल्ले - यामुळे तेथील २३ राज्यांपैकी २२ राज्यात हिंसेने विस्थापन चालू आहे. ज्या एका राज्यात हे विस्थापन झाले नाही, तेथे दोन चक्री-वादळांच्या तडाख्याने लोक बेघर झाले. हे लोक (आणि बहुतेक सगळीकडचेच विस्थापित) 'तात्पुरत्या' घरांमध्ये रहातात - शाळा, तंबू, झोपड्या, वगैरे. पाणी, स्वच्छता, उपजीविकेचे साधन, जिवंत राहण्यासाठीचे किमान संरक्षण, आरोग्यसेवा अशा अनेक गरजा भागत नाहीत. स्त्रियांना लैंगिक शोषणाची भीती असते. अनेक प्रसंगी कुटुंबीयांची फारकत होते. त्यामुळे पोरक्या मुलांची संख्याही वाढते. ती आजमितीला लाखावर असावी. मुले पूर्णपणे स्वयंसेवी संघटनांवर अवलंबून असतात.

सीरियातही अरब वसंतादरम्यान लोकांचे असद राजवटीविरुद्ध निषेध चालू झाले. तेव्हापासून सरकारने जनतेवर लादलेले युद्ध आता सहा वर्षे चालू आहे. दरम्यान इस्लामिक स्टेटचा हिंसाचार, तुर्कस्तान (असद सरकारविरोधी) तर रशिया-व-इराण (असदच्या बाजूने) यांचा परस्पविरोधी सशस्त्र हस्तक्षेप - हे महत्त्वाचे हिंसक घटक. (याचा आढावा 'आंदोलन' मध्ये - मार्च '१२ पासून एप्रिल '१६ पर्यंत वेळोवेळी घेतला आहे.) सीरियातील अलेप्पो हे शहर बशर असदच्या व रशियाच्या सैन्याने डिसेंबर' १६ च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत बेचिराख व निर्मनुष्य केले. त्याची लोकसंख्या कत्तल सुरु होण्याआधी २० लाखाच्या आसपास होती. (तेथून यावर्षी विस्थापित झालेले वरच्या १३ लाखात नाहीत.)

इतरत्र कारणे निराळी पण परिणाम हाच. काँगो, सुदान व द. सुदान (आफ्रिका) येथे यादवी; कोलंबियामध्ये (द. अमेरिका) अलीकडे तह होईपर्यंत गेली पन्नास वर्षे चालू असलेल्या गनिमी डावे व सरकारी फौजा यांच्यातील सशस्त्र संघर्ष ('आंदोलन' नोव्हेंबर '१४), नायजेरियात बोको हराम या दहशतवादी संघटनेमुळे ('आंदोलन' जून '१४), इत्यादी.

कदाचित कोलंबियातील सोडता यातील बहुतेक संघर्ष नजीकच्या भविष्यात संपुष्टात येण्याची शक्यता कमी असल्याने प्रश्न बिकटच होत जाणार.

**निर्वासित**

जागतिक बँक निर्वासित कोणत्या भूभागातून येतात ते नोंदवते. त्यानुसार अरब जगतातून ६२ लाख, पूर्व आशियातून ११ लाख, युरप व मध्य आशियातून साडेपाच लाख हे प्रमुख.

जगातील तीन देशातून सर्वाधिक निर्वासित येतात. युद्धग्रस्त सीरिया - ४० ते ५० लाख (२०१४ ची लोकसंख्या - पावणे-दोन कोटी); गेली अनेक वर्षे युद्धग्रस्त व अराजक असणारा अफगाणिस्तान - २७ लाख (२०१६ ची लोकसंख्या सव्वा-तीन कोटी) आणि अफगाणिस्तानसारखेच 'फसलेले' राष्ट्र-राज्य - सोमालिया - ११ लाख (२०१४ ची लोकसंख्या - सव्वा कोटी). म्हणजे सीरियन लोकसंख्येतील एक-तृतीयांशापेक्षा जरा कमी लोक देशोधडीला लागले आहेत, तर अफगाणिस्तान, सोमालियातील सुमारे दहा टक्के. (देशांतर्गत विस्थापित निराळे. ते धरले तर निम्मा सीरिया स्थलांतरित आहे.) त्यानंतर सुदान व नव्याने स्वतंत्र झालेला दक्षिण सुदान - प्रत्येकी सहा-साडेसहा लाख, काँगो - पाच लाख, मियान्मार - पावणेपाच लाख, सेन्ट्रल आफ्रिकन रिपब्लिक - चार लाख वगैरे.


वेगळ्या प्रकारे निर्वासितांचा उगम पहाता संघर्ष व युद्धग्रस्त प्रदेशातून एक कोटीहून जास्त निर्वासित येतात. अतिशय कर्जबाजारी गरीब देशातून ६० लाखाच्या वर.

**हे लोक सध्या कोठे आहेत?**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीप्रमाणे खंडानुसार निर्वासितांचे सध्याचे वसतीस्थान पुढील प्रमाणे - उत्तर आफ्रिका आणि मध्य-पूर्वेत ३९%, उरलेल्या आफ्रिकेत २९%, आशियात १४%, अमेरिका खंडात १२ % तर युरपमध्ये ६%. देशानुसार तुर्कस्तानमध्ये २५ लाख, पाकिस्तानमध्ये १६ लाख, लेबननमध्ये ११ लाख, इराणमध्ये १० लाख , इथिओपियामध्ये साडे-सात लाख तर जॉर्डनमध्ये साडे-सहा लाख निर्वासित आहेत. लेबनन, जॉर्डनच्या लोकसंख्या प्रत्येकी एक कोटीने कमी असल्याने त्या समाजांवर इतर मोठ्या देशांपेक्षा जास्त ताण येतो.

याबाबत एक मुद्दा नमूद करायला हवा. संयुक्त राष्ट्र-संघाच्या १९५१ च्या ठरवानुसार फक्त युद्ध किंवा स्वदेशी छळ या

कारणांनी देश सोडणाऱ्या लोकांना निर्वासित म्हणता येते. ते जेथे जातील त्या सरकारवर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी येते. पण आजही अनेक देश या लोकांच्या संरक्षणाची व्यवस्था करत नाहीत कारण बहुतेकांना निर्वासितच नकोत. त्यात पश्चिम आफ्रिकेतील निर्वसनामागे युद्ध हे एकच कारण आहे असे म्हणता येत नाही. ते पुढे जरा विस्ताराने पाहू.




## पश्चिम आफ्रिका

पश्चिम आफ्रिकेतील देश म्हणजे (कंसात लोकसंख्या) - नायजेरिया (१८ कोटी), आयव्हरी कोस्ट (अडीच कोटी ), नायजर (२ कोटी), माली (पावणे-दोन कोटी) वगैरे एकूण सतरा. (नकाशा क्र.१) पश्चिम आफ्रिकेची एकूण लोकसंख्या ३४ कोटी. यातील बऱ्याच देशांतून फार मोठ्या प्रमाणावर लोक स्थलांतरित होतात. उदा. अल्जेरिया किंवा लिबिया या देशांना तीन लाखाहून अधिक लोक रवाना झाले. त्यात नायजर आणि मालीतील जास्त.

पारंपारिक वसतीस्थान ते उद्दिष्ट ठिकाण हा प्रवास धोकादायक, प्रसंगी जीवघेणा असतो. त्यांचा स्वत:चा आणि जेथे जायचे तो - हे दोन्ही देश सीमा पार करताना त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणून पहातात. जगाच्या दृष्टीने ते आर्थिक कारणांनी स्वदेश सोडणारे निर्वासित असतात. याचा अर्थ असा की राजकीय छळामुळे देश सोडाव्या लागणाऱ्या - कवी, लेखक, सिनेमा बनवणारे , इत्यादी लोकांपेक्षा यांचे महत्त्व कमी असते. हे 'सामान्य'. दलालांना पैसे देऊन, असुरक्षित वाहनांनी त्यांचा प्रवास होतो. वाटेत आहे ती चीजवस्तू बहुधा लुबाडली जाते, गुंडांच्या टोळ्या बलात्कार, मारपीट करतात. हा छुपा प्रवास अनेक देशातून होतो. तरीही लोक तो करतात कारण स्वदेशातील परिस्थिती या तुलनेत असह्य असते. उदा. मालीमध्ये अल-कईदा विरुद्ध सरकारी फौजा यांच्यात सतत संघर्ष चालू असतो. शेतीवर अवलंबून असलेल्या बहुतांश लोकांना पावसाची अनिश्चितता, दिवसाचे वाढते तपमान, दुष्काळांची वाढती तीव्रता आणि ते वारंवार होणे इत्यादी कारणांनी शेती करणे अशक्य झाले आहे. उदा. नायजरमध्ये नाचणीसारखे पीक एका पिढीपूर्वीपर्यंत पुरुषभर उंचीचे येत असे. आता जेमेतम गुडघ्याएवढे वाढते. सध्या तिथल्या एका भागात तर फक्त एका प्रकारचे कडधान्य पिकते. लोक तिन्ही-त्रिकाळ तेच खातात - उकळून, दळून मीठ आणि पाण्याबरोबर. झाडे तर सरपणासाठी केव्हाच छाटली गेलेली आहेत. गाई, मेंढ्या ही गुरेही या पिढीत अन्न विकत घेण्यासाठी विकली गेली आहेत. मग लोक प्रथम गाव सोडून देशातील शहरांकडे वळतात. तेथे नोकऱ्या नाहीत हे लक्षात आल्यावर देश सोडायला मजबूर होतात.

तेथून बाहेर पडलेल्या दोघांची उदाहरणे प्रातिनिधिक मानता यावीत. नायजरमधील एका एकवीस वर्षाच्या तरूणाच्या पारंपरिक शेतात सततच्या दुष्काळाने भात, नाचणी ही पिके येईनाशी झाली. विशीच्या आत तो जवळच्या बाजाराच्या गावात काही काळ घड्याळे विकत असे, मग शेजारच्या आयव्हरी कोस्ट देशात शेतमजूर म्हणून त्याने काम केले. तेथे थोडीफार बचत करून आता त्याला लिबियाला जायचे आहे. तेथून शक्य झाल्यास भू-मध्य समुद्र पार करून इटलीला.

मालीमधला एक तिशीतला माणूस आधी शेजारच्या नायजेरियात गेला. तिथे अनेक वर्षे मिळेल ते काम करत राहिला - हमाली, बागांना पाणी घालणे वगैरे. मग परत आला आणि अल्जेरियाला गेला. तिथे तर भीक मागून राहिला. काही महिन्यातच अल्जेरियन सरकारने अशा सगळ्या अनधिकृत लोकांना परत नायजरला रवाना केले. या सगळ्या देशाबाहेरच्या वास्तव्याची त्याची कमाई सुमारे आठ हजार रुपये. घरी परतला तर दरम्यानच्या काळात घरच्यांनी त्यांच्या पाच शेळ्यातल्या चार शेळ्या पैशासाठी विकल्या होत्या आणि त्याने आणलेल्या पैशाएवढे कर्ज काढले होते. या माणसावर अवलंबून बरेच कुटुंबीय - बायको, त्यांची स्वत:ची चार आणि दिवंगत भावाची सात मुले.

या प्रदेशात पुनरुत्पादनाचा वेगही वाढत आहे. एक स्त्री सरासरी सात मुलांना जन्म देते. आधी खाण्याची टंचाई, त्यात ही वाढती प्रजा. याचा परिणाम म्हणजे उपासमार. जगातील कुपोषित बालकांचे प्रमाण नायजरमध्ये (भारताशी तुलना करण्यासारखे म्हणजे) जास्त आहे. तेथे पाच वर्षाखालील एकूण

बालकांमध्ये दीर्घ-कालीन कुपोषित बालके ४५% हून जास्त आहेत.

**पर्यावरणाची अधोगती**

गेल्या चाळीस वर्षात नायजरचे तपमान सात दशांश सेल्सिअसने वाढले. शेजारच्या चाड , मालीमध्ये आठ दशांशाने. आधीच ते दिवसा ४५ डिग्रीच्या आसपास असते. हे उष्ण हवामान मलेरिया पसरवणाऱ्या डासांना पोषक असते, पिकांना कीड जास्त लागते, मका, गहू या पिकांवर अनिष्ट परिणाम होतो.

त्यात पाण्यासाठी संघर्षांची भर पडते. पर्यावरणातील दीर्घकालीन बदलामुळे नागरी हिंसाचारांची शक्यता वाढते. हे संघर्ष निराळ्या व्याधीची लक्षणे असतात. हा धोका सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील संपूर्ण आफ्रिकेत - पश्चिमेतील मालीपासून पूर्वेच्या इथिओपियापर्यंत आहे.एक उदाहरण म्हणजे वर उल्लेखिलेली बोको हराम ही मुस्लिम आतंकवादी संघटना उत्तर नायजेरियात सक्रिय आहे. त्यांनी दोन वर्षांपूर्वी २५० वर शाळकरी मुलींचे अपहरण केले, बहुतेकींचा अजूनही पत्ता नाही. बाकी अत्याचार, हत्याकांडे, शेते जाळणे, शाळा जाळणे चालूच असतात. या भयाने तेथून कमीत कमी ३ लाख लोक तो प्रदेश सोडून आता नायजर, नायजेरिया, चाड आणि कामेरून देशांच्या सीमा जेथे मिळतात, तेथे कसेबसे रहात आहेत. त्यांना ना संरक्षण, ना उपजीविकेची साधने. चाड तळ्याचे खोरे सात शेजारी देशांचा काही भाग व्यापते - मुख्यत: चाड व नायजर. येथील सुमारे २४ ते ४४ लाख लोक (त्यातील ६० टक्केहून जास्त १८ वर्षांखालील मुले) बोको हराम, अन्न-टंचाई अशा विविध कारणांनी विस्थापित झाले आहेत. जवळ जवळ एक कोटींना तातडीची मदत आवश्यक आहे.

Main migrant route to Germany




या स्थितीत छोट्या संघर्षांबरोबर बंडेही होतात. त्यावर 'नजर' ठेवायला अमेरिकेचा एक लष्करी तळ नायजरमधील अगादेझ शहराजवळ आहे. महाशक्तीचा आज चंचुप्रवेश, उद्या संभाव्य प्रवेश व दुष्काळ यातील संबंध लक्षात यावा.

**निर्वासित : पूर्वार्ध**


अशा परिस्थितीत स्थलांतरण-इच्छुकांची संख्या प्रचंड असते. त्यामुळे तो एक मोठा व्यवसाय झालेला आहे. अधिकृत सरकारी निश्चित धोरणाचा व देखरेखीचा अभाव यामुळे हा व्यवसाय या सगळ्याच अशांत प्रदेशात - आफ्रिका, मध्य-पूर्व - फोफावला आहे. माणसांची वाहतूक करणारे कंत्राटदार म्हणजे स्मगलर्स, वाहने चालवणारे ड्रायव्हर, कर्जाऊ पैसे देणारे सावकार, चलनांची अदलाबदल करणारे, वेश्या व त्यांचे दलाल, स्थानिक पोलीस इत्यादी अनेकांना हे घबाड सापडले आहे. अनेक स्मगलर्स आधी असेच स्थलांतरित मजूर होते. आता ते व्यापारी झाले. प्रत्येक देशातून दुसऱ्या देशाला जाऊ पहाणाऱ्यांचा मार्ग निराळा असतो पण बहुधा तो लीबियातून जातो कारण लीबियात अराजक आहे. उदा. नायजरहून लीबियाला व त्यापुढे युरपला जाणारे वर म्हटलेल्या अगादेझ नावाच्या शहरात एकत्र होतात. संध्याकाळी त्यांना एका ट्रकमध्ये कोंबण्यात येते आणि प्रवास चालू होतो.

वाटेत पोलीस नियंत्रण कक्षाला लाच दिली जाते. वाळवंटातील या सुमारे अडीचशे किलोमीटर्सच्या प्रवासाला तीन दिवस लागतात. प्रवासात काही लोक ट्रकमधून खाली पडतात, मरतात - त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. हीच वेळ लीबियातून भूमध्यसमुद्रातून युरपला जाऊ इच्छिणाऱ्या लोकांवर अनेकदा आलेली आहे. त्यांना समुद्र-प्रवासासाठी असुरक्षित पडावात बसवले जाते आणि नेले जाते. २०१६ मध्ये असे अनेक पडाव उलटून किमान साडेचार हजार लोकांना जलसमाधी मिळालेली आहे. त्यांची ओळखही पटत नाही. पण बहुतेक आफ्रिकन.

लीबियाला जाऊ पहाणारे सगळेच लीबियात पोचतात असेही नाही. काहींना अटक होते. काहींवर गुंडांच्या, आतंकवाद्यांच्या टोळ्या बलात्कार करतात, मारहाण करतात, बाकी शारीरिक हाल करतात आणि पैसे मागतात. अनेक इच्छुकांचा लीबियाला जाण्याचा प्रयत्न इथे संपुष्टात येतो, मग युरप दूरच. ते कसेबसे मायदेशी परततात. हा प्रयत्न फसल्याची, कुटुंबीयांना पैसे

पाठवण्यापेक्षा पुन्हा त्यांच्यावर अवलंबून रहाण्याची वेळ – याची शरम आणि भविष्याचा अंधार हे मानसिक क्लेश असतात. २०१६ डिसेंबरपर्यंत असे सुमारे एक लाख पश्चिम आफ्रिकन मायदेशी परतलेले आहेत. बहुधा हे घर-वापसी आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांच्या केंद्रावर हजर होतात. तेथे त्यांचे ओळख-पत्र, सरकारी परवानगी तपासली जाते. ते म्हणतात तेथे कुटुंबीय खरोखर आहेत वगैरे. विशेषत: अज्ञान मुलांसाठी त्यांच्या पालकांची खात्री करण्यात येते. अनेक मुलांबाबत ही माहिती मिळत नाही. या उपचारातही भ्रष्टाचार असतो. विशिष्ट देशाच्या नागरिकांना परतीचे प्राधान्य मिळू शकते.

'आंदोलन'च्या ऑक्टोबर २०१५ च्या अंकात पुढील इतरत्रच्या निर्वासितांचा आढावा घेतलेला आहे. अफगाणिस्तानातून इराणमार्गे युरपला येऊ पहाणारे, उ. आफ्रिकेतील मोरोक्को-अल्जीरियातून स्पेनला, पूर्व आफ्रिकेतील एरिट्रिया, सोमालियातून इजिप्तमार्गे ग्रीसला, सिरियातून तुर्कस्तान-मचेदोनिया-बल्गेरिया-रोमानिया- हंगेरीमार्गे ऑस्ट्रिया किंवा तुर्कस्तान-ग्रीस-मचेदोनिया-सर्बिया-क्रोएशिया-हंगेरीमार्गे ऑस्ट्रिया. (नकाशा क्र. २ व ३ )



Source: Frontex GENE THORP/THE WASHINGTON POST

या प्रवासातील बळींची उदाहरणे – मध्यपूर्वेतील ७१ निर्वासित (त्यात चार लहान मुले) स्मगलर्सच्या अन्नाची वाहतूक करण्यासाठी असलेल्या फ्रीजसारख्या हवाबंद ट्रकमध्ये गुदमरून मरण पावल्याचे ऑस्ट्रियात आढळले, एलान कुर्दी या तीन वर्षाच्या मुलाचे शव तुर्कस्तानच्या किनाऱ्यावर सापडले. या घटनांनी (निदान युरपमध्ये) तात्कालीन जरा अस्वस्थता निर्माण झाली. तेवढ्यापुरती चुकचुक करून लोक पुढच्या आतंकी हल्ल्याची वाट पाहू लागले. पडाव उलटून निर्वासित मृत्युमुखी पडण्याचे प्रकार तर आजतागायत चालू आहेतच.

**निर्वासित : उत्तरार्ध**

निर्वासित जीव धोक्यात घालून युरपला येतात. पण प्रवेश ते नागरिकत्व यात मोठे अंतर असते. त्यांना नागरिकत्व मिळणार याची खात्री नसते. प्रथम त्यांना त्यांच्यासाठी उभारलेल्या खास छावण्यांत ठेवण्यात येते. मग सरकारी अधिकारी प्रत्येकाची मुलाखत घेतो. त्या देशाचे कायदे, संयुक्त राष्ट्र-संघाचे निर्देश यानुसार अर्जदार खरोखर त्या देशात राहू शकेल का हे ठरवले जाते. युरपमधील नागरिकत्व हा त्या देशावर खर्चिक बोजा असतो. त्याबरोबरच निर्वासितांचे लोंढे तद्देशीयांना फारसे पसंत नसतात. हंगेरीसारखे काही देश तर सरळच मुस्लिम निर्वासितांना आश्रय देण्याविरुद्ध आहेत. पण जर्मनी, ऑस्ट्रियासारख्या निर्वासितांचे अधिकृत स्वागत करणाऱ्या देशातही जनमत आता फारसे अनुकूल नाही. या दोन टोकांमध्ये नाइलाजाने निर्वासितांना प्रवेश देणारे तुर्कस्तान, ग्रीस, इटली हे देश येतात कारण निर्वासित त्यांच्या सीमांवर येऊन धडकतात. त्यात बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी येथे मुस्लिम आतंकवाद्यांचे सामान्य नागरिकांवरील विकृत घातक हल्ले वाढत आहेत. त्यात खंड नाही. आज विमानतळावर आत्मघातकी हल्ल्यात पन्नास निष्पाप मृत्युमुखी तर उद्या संगीताच्या मैफलीत शंभर जण. आज फ्रान्समध्ये वार्षिक रोषणाई पहायला आलेल्या ७०-८० पादचाऱ्यांना आतंकवादी ट्रकखाली चिरडून ठार मारतो तर उद्या जर्मनीत ख्रिसमसच्या जत्रेत. या घटनांमुळे त्यांच्याबद्दलची सहानुभूती कमी होते. अनेक प्रसंगात हे हल्लेखोर त्या देशाचे नागरिक असतात, निर्वासित नाही. पण आजचा निर्वासित नागरिकत्व मिळवून हेच उद्योग उद्या करेल ही साधार भीती निर्माण होते.

निर्वासिताच्या नागरिकत्वाच्या अर्जाची तपासणी करणारा सरकारी अधिकारी अशा विविध दडपणांखाली काम करत असतो. त्यात निर्वासित ही तशी अनपेक्षित व अचानक सुरु झालेली प्रक्रिया असल्याने कोणत्याच देशात त्यांची काय निकषांवर छाननी करावी याचे नियम अजून निश्चित नाहीत.

उदा. इटलीमध्ये वरील अनेक देशातून निर्वासित आलेले आहेत. ६० टक्के इटालियनांना ते नको आहेत. मागील वर्षी आसऱ्यासाठी ८० हजाराहून अधिक अर्ज आले. ही आधीच्या वर्षापेक्षा प्रचंड वाढ होती. मग सरकारने अर्जांची छाननी करणारी कार्यालये २० वरून ४८ वर नेली. पण कार्यालये वाढवणे पुरेसे नाही. निश्चित निकष नसल्याने एक कार्यालय एका निर्वासिताचा

जो अर्ज नाकारते, तोच अर्ज इटलीतीलच दुसरे कार्यालय स्वीकारू शकते. किंवा तो अर्ज ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीत केला तर प्रत्येक ठिकाणी निराळा निर्णय होऊ शकतो. तीन वर्षांपूर्वीपर्यंत इटलीतल्या निर्वासितांच्या छावण्यात २८ हजार लोक होते. आता पावणे-दोन लाख आहेत. ज्याचा जसा नंबर लागेल तशी आसरा द्यायचा का नाही याची सुनावणी होते.

इटलीला आल्यापासून निर्णय होईपर्यंत कित्येक महिने लोक छावण्यात असतात. बोलावणे आले की प्रथम एक अधिकारी वैयक्तिक मुलाखत घेतो व अर्जदाराचा तपशील लिहून घेतो. अशा पाच अधिकाऱ्यांची एक समिती असते. त्या समितीपुढे प्रत्येक अधिकाऱ्याने केलेल्या सुनावणीचा अहवाल ठेवला जातो. ही समिती निर्णय घेते. त्यायोगे एका व्यक्तीने एका निर्वासिताचे भवितव्य ठरवू नये याची खबरदारी घेतली जाते. सगळेच अधिकारी या कामात अनुभवी नसतात. कोण अधिकारी कोणाच्या नशिबी येतो ही लॉटरी असते. सुनावणीनंतर निर्णय कळायला काही काळ जातो.

सुनावणीतील निकष म्हणजे ज्या कारणाने निर्वासित येतो, ते कारण व परतल्यास संभाव्य धोक्याची प्रतवारी. सीरिया किंवा एरिट्रियासारख्या यादवीग्रस्त प्रदेशातून आलेल्याला आसरा मिळण्याची शक्यता इतरांपेक्षा जास्त असते. फक्त घरी त्रास देतात हे कारण खरे, परतल्यास जीवघेणे ठरू शकणारे असले तरी पुरेसे नसते. उदा.एका नायजेरियन स्त्रीचे आई-वडील मरण पावले होते. इतर कुटुंबीय तिचा छळ करत असत किंवा दुसऱ्या नायजेरियन माणसाच्या भावाचा गुंडांनी खून केला होता आणि त्याचे सावत्र वडील त्याची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत होते. परतल्यास त्याच्या जीवाला त्यांच्याकडून आणि पोलिसांकडूनही धोका होता. आणखी एक १९ वर्षांचा बांगलादेशी. तो निर्वासितांसाठी चालवलेले इटालियन भाषेचे क्लासेस टाळत असे, कारण त्याला स्वत:ची भाषाही लिहिता वाचता येत नाही, ही लाज. तो बांगलादेशातील एका अनाथाश्रमात वाढला. तेथून त्याला एका कुटुंबाने अनौपचारिकरीत्या दत्तक घेतला. हे पालक मरण पावल्यावर तो त्यांच्या खऱ्या मुलग्याबरोबर राहिला. हा मानलेला भाऊ विरोधी राजकीय पक्षाचा कार्यकर्ता. त्याला हुडकत सत्ताधारी पक्षाचे गुंड आले. तो तर सापडला नाही मग त्यांनी याला बेशुद्ध होईपर्यंत बदडला आणि खुनाची धमकी दिली. याने पैसे उसने घेतले आणि लीबियाला पळ काढला. तेथे ज्या हॉटेलमध्ये काम करत होता ते तिथल्या यादवीत नष्ट झाले. मग स्मगलरच्या बोटीने तो इटलीला आला. 'मी परत बांगलादेशाला गेलो तर मला ते लोक सूडापोटी ठार मारतील.' अशी त्याची याचना होती.

हे सगळे अर्ज आसऱ्यासाठी फेटाळले गेले.

अशा प्रकरणांना कायदा शब्दश: लावता येत नाही. हे सुनावणी करणारे अधिकारीही मान्य करतात. पण त्यांचे हातही नियमांनी बांधलेले असतात. फार तर 'आसरा' या शब्दाचा कीस काढला जातो. इटालिअन म्हणून नागरिकाला मिळणारे सर्व हक्क व अधिकार हा सगळ्यात वरच्या प्रतीचा आसरा म्हटला तर त्याखाली मर्यादित संरक्षण वगैरे प्रती असतात. काही निर्वासितांना असे निम्न-दर्जाचे संरक्षण दिले जाते. इतरांना मायदेशी परत पाठवले जाते. सीरियाखेरीज नायजेरिया, बांगलादेश व गाम्बिया या देशातील निर्वासित इटलीला जास्त येतात. त्यातील फक्त दोन टक्के नायजेरियन लोकांना या वर्षी आसरा मिळाला.

या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नकारघंटा वाजली की त्यावर पुनर्विचार व्हावा असा अर्ज करता येतो. त्या निर्णयाला वर्षही लागू शकते. बहुतेक त्या फंदात पडत नाहीत. काहीजण छावण्यातून पळ काढतात आणि बेकायदेशीररीत्या बांधकामावर मजूर वगैरे कामे करतात. त्या तुटपुंज्या कमाईवर इटलीत रहातात, काहीजण अमली पदार्थांच्या व्यापारात अडकतात, वगैरे.

निर्वासित होऊन युरपला येण्याचा हा उत्तरार्ध.

## अ-नागरिक

ज्या लोकांना कोणत्याच देशाचे नागरिकत्व नाही त्यांना अनागरिक म्हणू. (वर म्हटल्याप्रमाणे जगात १ ते ३ कोटी). यांची आकडेवारी मिळणे तर आणखीच कठीण असते कारण ते ज्या देशात राहतात त्या देशाच्या गणतीतच ते नसतात. या अनागरिकत्वाची काही कारणे अशी - काही देश विशिष्ट वंशाच्या/श्रद्धेच्या/धर्माच्या लोकांना नागरिकत्व नाकारतात. उदाहरणार्थ मियान्मारमधील राखिन प्रांतातील मुस्लिमांना ते मुस्लिम म्हणून मियान्मारचे नागरिकत्व नाकारलेले आहे. यांची संख्या त्या देशात १० लाखावर असावी. तेथून बांगलादेशाला व थायलंडला आणखी काही लाख निर्वासित म्हणून गेले असावेत. नेपाळमध्ये एक लाख भूतानी; कुवेतमध्ये भटक्या अरब जमातींना कुवेती धरले जात नाही (सुमारे २ लाख). लेबनॉनमधील पॅलेस्टिनियन, जपानमधील कोरियन वंशाचे लोक, असे इतर.

जगातील २७ देशांत आईचे नागरिकत्व मुलाला आपोआप मिळत नाही. मध्यपूर्व व उत्तर आफ्रिकेतील देश यात आहेत. उदा. सुदान, लीबिया. वडील कोण हेच माहिती नसेल, ते परांगदा किंवा मृत असतील तर मुले अनागरिक होतात. सौदी अरेबियात स्त्रीने सौदी नसलेल्या पुरुषाशी लग्न केले तर मुलाला सौदी नागरिकत्व मिळत नाही. तीच गोष्ट जॉर्डनची.

बाकी कारणात नवीन देश जन्माला येणे आणि त्याने

आधीच्या त्या प्रदेशातील लोकांचे नागरिकत्व नाकारणे - उदा. - पूर्व जेरुसलेममधील पॅलेस्टिनियन अरब. आयव्हरी कोस्टमध्ये बुर्कीनाबे वंशाचे लोक - १९६० साली आयव्हरी कोस्ट स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात येण्याआधी ते दुसरीकडून तेथे स्थलांतरित झालेले आहेत. त्यांना कोणतेच नागरिकत्व नाही.

कारण काहीही असले तरी नागरिकत्व नाकारल्याने सरकारवर या लोकांची जबाबदारी राहत नाही. मुलांना शिक्षण मिळू शकत नाही, वैद्यकीय सेवा नाकारण्यात येते, कायदेशीर नोकरी करता येत नाही, सामाजिक सुरक्षा नसते, इत्यादी. नागरिक म्हणून अस्तित्वच नसते मग अधिकार, हक्क दूरच. (याखेरीज पॅलेस्टाईन देशाचे अस्तित्व संदिग्ध आहे.)

**विकसनशील देश - ते - विकसनशील देश स्थलांतर**

निर्वासितांचे वरील विवेचन जगातील अविकसित भागातून विकसित भागाकडे जाणाऱ्यांचे आहे. पण एका विकसनशील देशातून दुसऱ्या - बहुधा शेजारच्या - विकसनशील देशात जाणे हेही घडते. तो देश मायदेशापेक्षा विकासाच्या जरा वरच्या पायरीवर असतो.

या मुद्द्याच्या स्पष्टीकरणासाठी विस्थापित/निर्वासित या संज्ञा जरा बाजूला ठेऊ. त्याऐवजी देशाटन करणारे स्थलांतरित ही संकल्पना अधिक उपयोगी आहे. हे देशाटन चार प्रकारचे असते. पहिले - अविकसित देश ते विकसित देश (यात निर्वासित आले, पण इतरही वैध स्थलांतरित आले - ब्रिटनमधला पाकिस्तानी डॉक्टर). आज जिवंत असणाऱ्या १२ कोटी लोकांनी हे विकसनशील देश - ते - विकसित देश असे स्थलांतरण केले आहे. दुसरे विकसनशील देशांतर्गत (बांगलादेशी भारतात येणे). ही संख्याही मोठी आहे - ८ कोटी. तिसरे विकसित देशांतर्गत (अमेरिकन ऑस्ट्रेलियाला जाणे - ४ कोटी) आणि चौथे - विकसित देशातून विकसनशील देशात (फ्रेंच माणूस थायलंडमध्ये स्थायिक होणे - ७० लाख).

जितका माणूस गरीब तितका तो उपजीविकेसाठी कमीत कमी अंतर जाऊ इच्छितो. बसमधून शेजारच्या देशात जाणे त्याला परवडते. गरीब बांगलादेशी युरपला जाऊ शकत नाही, तो त्याच्या देशापेक्षा जरा बरी परिस्थिती असणाऱ्या भारतात येतो. हे जगभर आढळते. आफ्रिका खंडातील बुर्कीना फासो हा गरीब देश आहे, आयव्हरी कोस्ट हाही गरीब देश आहे पण बुर्कीना फासोपेक्षा जरा बरा. आजमितीला १५ लाख लोक बुर्कीना फासोहून आयव्हरी कोस्टला आलेले आहेत.

हे स्थलांतरण दोन-तीन घटकांनी सुलभ होते - एकतर सीमापार भाषा तीच असते. दुसरे, सांस्कृतिक जवळीक. आफ्रिकेत वसाहतवादी पश्चिमेने देशांच्या कृत्रिम सीमा आखल्या पण पूर्वापार त्याच जमाती दोन्ही 'देशांत' आहेत. मणिपूर-म्यानमार सीमेवर नागा जमातीत हे आढळते. तिसरे म्हणजे विकसनशील देशात असंघटित क्षेत्रात नोकऱ्या/व्यवसाय प्रचंड प्रमाणात उपलब्ध असतात. विकसित देशात ही शक्यता बहुधा नसतेच, असलीच तर बेकायदा असते. त्यामुळे सरकार दरबारी नोंद न होता माणूस दुसऱ्या विकसनशील देशात जगू शकतो. (छोट्या दुकानात वरकाम, घरकाम).

हे स्थलांतरित मायदेशी फार पैसा पाठवू शकत नाहीत पण जो काही जेव्हा केव्हा पाठवतात, तेव्हा तो घरच्यांना फार महत्त्वाचा असतो. यातील तफावत लक्षणीय असते. माली व नायजेरिया दोन्ही पश्चिमेच्या मापदंडाने गरीब देश आहेत. पण त्यातही मालीचे दरडोई उत्पन्न नायजेरियाच्या एक-चतुर्थांश आहे. मालीतील देशाबाहेर जाणाऱ्या कामगारांच्यातील ७५% हून जास्त आफ्रिकेतच जातात, त्यातही बहुसंख्य शेजारच्या देशांत. तर ७५% नायजेरियन युरप-अमेरिकेला जातात . सरासरी नायजेरिअन घरी दर-वर्षी २८०० डॉलर्स पाठवतो तर मालीचा माणूस ८०० डॉलर्स.

हे स्थलांतरित फारसे प्रकाशात येत नाहीत कारण रोजी रोटीच्या संघर्षात ते बहुश: निमूटपणे कामे करतात, त्यांना उपद्व्यापी सामाजिक सहभाग परवडत नाही. त्यामुळे मीडिया त्यावर फारसा गदारोळ करत नाही. राजकारणी त्याचे मतांसाठी सामान्यत: आजवर भांडवल करत नसत. या दोन्ही गोष्टी आज युरपमध्ये मुस्लिम स्थलांतरितांबाबत घडत आहेत. म्हणून जनमतही त्याबाबत क्षुब्ध आहे. आज युरपमधला उजव्या पक्षांचा अलीकडचा उदय प्रामुख्याने या कारणाने झाला आहे. तीच गोष्ट अमेरिका देशात आलेल्या व येणाऱ्या मेक्सिकन स्थलांतरितांची - तो मुद्दा ट्रम्पने भडकावला. अधूनमधून आपल्याकडची काही खोडसाळ मंडळी एका पिढीपूर्वी भारतात आलेल्या व येथे स्थायिक झालेल्या एक कोटीहून अधिक व भारतभर विखुरलेल्या बांगलादेशींची हकालपट्टी करा असे प्रतिपादन करतात. अर्थव्यवस्थेतील या लोकांचे योगदान अशी नारेबाजी नाकारते.

## निरीक्षण

गरीबी, पर्यावरणाच्या हानीमुळे (किंवा त्याशिवायही) नैसर्गिक आपत्तींचे वाढते प्रमाण, राष्ट्र-राज्यप्रणीत किंवा राष्ट्र-राज्यदुर्लक्षित हिंसाचार, अक्षम भ्रष्ट सरकार, राष्ट्र-राज्याच्या सीमा न मानणारे धार्मिक मूलतत्त्ववादी अशी अनेक कारणे स्थलांतरामागे असतात.

या प्रत्येकाचा ऊहापोह शक्य नाही म्हणून पर्यावरण व हिंसा पाहू.

हवामानाच्या बदलाने होणारी मनुष्यहानी भूकंपासारख्या भूतलाशी संबंधित आपत्तींपेक्षा खूपच जास्त असते.

जमीन आणि पाणी यांची मागणी वाढत आहे. समुद्राची वाढती पातळी, विस्तारणारे वाळवंट आणि अनिश्चित हवामान या घटकांमुळे ही परिस्थिती येत्या दशकांमध्ये आणखीच गंभीर होणार व स्थलांतरितांमध्ये भर पडणार.

उदा. एल-निनो सदर्न ऑसिलेशन (ENSO) या पर्यावरणाच्या (अ)नियमित चक्राचे अनेक अनिष्ट परिणाम होतात. पृथ्वीचे (भू-पृष्ठ व समुद्र) तपमान वाढणे, काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी कमी पाऊस, प्रचंड वादळे, इत्यादी. त्यातील मानवी जबाबदारी किती हे आज विवाद्य आहे. त्यामुळे त्यावर माणूस कितपत नियंत्रण करू शकेल याबद्दलही साशकंता आहे.

शहरांत अगदी श्वास घेणे अशक्य झाल्याने चीनने पर्यावरणाच्या अधोगतीची दाखल आत्ता कुठे घेतली आहे. अमेरिकेची येती राजवट तर ही अधोगतीच नाकारत आहे. अमेरिका जरी पर्यावरण दूषित करणारा आघाडीवरचा देश असला तरी भविष्यात तिच्याखेरीज उर्वरित जगाला ती पावले उचलावी लागतील. पर्यावरणासंबंधी परिषदेत नुकतेच १०० देशांनी हा प्रश्न तरी मान्य केला. या प्रश्नामुळे लोकांना मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करायला लागेल हेही मान्य केले पण त्याबाबत उपाय-योजनेबद्दल मौन राखले.

हिंसाचाराबाबत आज सीरियातील अलेप्पोच्या पाडावानंतर मध्यपूर्वेतील व इतर हुकूमशहांना कत्तल करणारी शासकीय हिंसा हे विरोधाला परिणामकारक उत्तर आहे असे वाटत आहे. त्याला आळा म्हणून बाहेरून हस्तक्षेपाबाबत त्या देशाची सीमांतर्गत स्वायत्तता हा प्रश्न येतो. ती अमान्य करण्याची ऐतिहासिक उदाहरणे अमेरिकेने आजवर बरीच दिली आहेत - अलीकडच्या अफगाणिस्तान, इराकपर्यंत. हुकूमशाही बळकट करण्याचे उदाहरण इराण व रशिया सीरियात देत आहे. या कोणत्याही प्रकारच्या सत्ता-साठेमारीने स्थलांतरित वाढतात.

तात्पर्य, हा प्रश्न एकरेषीय नाही. म्हणजे एका भौगोलिक भागात भिन्न धार्मिक/वांशिक/वर्णीय/वर्गीय अस्मिता असतात म्हणून संघर्ष किंवा दहशतवाद व म्हणून निर्वासित/विस्थापित हे प्रश्नाचे सुलभीकरण आहे. आपल्या आदर्शवादाच्या चष्म्याने व प्रसारमाध्यमांच्या काळ्या-पांढऱ्या मांडणीने हा भ्रम निर्माण होतो. अनेक ठिकाणी नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण कोणाचे हे पर्यावरणीय कारण महत्त्वाचे असते. तो कार्यकारणभावही, त्याचा तो, एकरेषीय धरता येत नाही. त्याची अभिव्यक्ती दृश्य भिन्न अस्मितांच्या संघर्षात होते. हेही लेखावरून स्पष्ट व्हावे.


**_चन्द्रशेखर पुरन्दरे_**

*आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे व सामाजिक विषयांचे अभ्यासक, चित्रकार*

*www.art-non-deco.com*

*artnondeco@yahoo.co.uk*